!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४९५ ०४-७-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## जायकवाडीच्या प्रकारात दाबादाबी खपवून घेणार नाही -खासदार चंद्रकांत खैरे

### प्रश्न लोकसभेत उपस्थित करुन जल आयोग व वॉटर रिसोर्स मंत्रालयाकडे तक्रार करणार

संभाजीनगर दि.२५- संभाजीनगर, जालना शहरासह २०० गावांचा व उद्योगांचा पाणीपुरवठा प्रभावित होवून प्रचंड पाणी टंचाईला सामोरे जावे लागेल अशा घृणास्तपद जायकवाडीच्या पाण्यावर दरोडा टाकण्याचा प्रकार घडत असतांना वनविभाग, पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन व जायकवाडीचे अधिकारी झोपले होते का? असा सवाल उपस्थित करत १५ दिवस उलटूनही संबंधीतावर कारवाई का झाली नाही याचा जाब शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी जायकवाडीच्या पाण्यावरील दरोडयाच्या संदर्भात सुभेदारि येथे बोलविलेल्या संयुक्त बैठकीत अधिका-यांना विचारला.

पैठण तालुक्यातील ढाकेफळ येथे संजीवनी पाणी वापर संस्थेने साडे सातशे मीटरचा तीस फुट खोल व पन्नास फुट रुंद ऐवढा अवाढव्य ॲप्रोच कॅनॉल खोदला पंधरा दिवसांपेक्षा जास्त कालावधीत पंधरापेक्षा जास्त जेसीबी व पोकलेन मशीनसह ब्लास्टींग मशीनने इकोसेन्सीटीव्ह झोनमध्ये कालवा खोदला जात असतांना कुणालाच कसा थांगपत्ता लागला नाही हे कृत्य साटेलोटे असल्याशिवाय शक्य नाही. त्यामुळे शाखा अभियंत्यापासुन ईडीपर्यंतच्या अधिका-यांना निलंबित करा अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व जलसंपदाचे प्रधान सचिव गवळी यांच्याकडे फोनवर संपर्क साधून केली. शिवाय हा प्रश्न लोकसभेत उपस्थित करुन जल आयोग व वॉटर रिसोर्स मंत्रालयाकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी अधिका-या समक्ष स्पष्ट केले.

वृत्तवाहिन्या व वृत्तपत्रांनी होत असलेला गंभीर प्रकार समोर आणुनही प्रशासन कार्यवाही करण्यास टाळाटाळ का करत आहे, कुणाचा दबाव आहे असा सवाल उपस्थित करत कुणीही असला तरी त्याची गय करु नका असा सज्जड दमही त्यांनी अधिका-यांना दिला. यावेळी उपविभागीय अधिकारी केशव नेटके, कडाचे अधिक्षक अभियंता एम.के. पोकळे, जायकवाडीचे कार्यकारी अभियंता एस.व्ही. भरगवदेव, उपविभागीय अभियंता एस.एस. भावठाणकर, उपआयुक्त आयुब खान, रविंद्र निकम, मुख्य अभियंता सखाराम पानझडे, ए.बी. देशमुख, वसंत निकम, उपवन संरक्षक बाळासाहेब जगझाप, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी वायाळ, पैठणचे पोलीस निरीक्षक रविंद्र शिंदे, जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, बी.व्ही. जोशी, अशोक पटवर्धन यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक शिंदे यांनी सांगितले की, गुन्हा नोंद झाला तेव्हा पाहणीसाठी घटनास्थळी पोहोचल्यावर तेथे कुणीही उपस्थित नव्हते. जायकवाडी कार्यालयाकडून तक्रार दाखल करतांना फक्त दोनशे फुट चर खोदल्याची तक्रार होती. परंतु मोजमाप केल्यावर चर साडे सातशे मीटरचा असल्याचे नोंद केले गेले आहे. फिर्याद दाखल करणा-यांनी त्यांचे म्हणणे मांडले असुन शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी वेळोवेळी काम बंद करण्याच्या नोटीसा देण्यात आल्याचे म्हटले आहे. घटनास्थळी दाखल होवून निरीक्षण करीत असतांना फिर्यादींनी दिलेल्या दोन्ही संशयीतांना जामीन मिळाल्याचे समजल्याने पुढील चौकशीला कोणतीही माहिती प्राप्त होत नसल्याचे शिंदे यांनी सांगितले. जायकवाडीच्या अधिका-यांनी संबंधीत संशयीत पाणी वापर संस्थेच्या संचालकांची व नोटीसा बजावल्या त्यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या व्यक्तींची व वाहनांची तपशील द्यावा अशी मागणी करुनही अजुनही संबंधीत कार्यालयाकडून माहिती प्राप्त होत नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.

तहानलेल्या मराठवाडयाच्या आशेचा किरण असलेले जायकवाडीचे पाणी पळवण्याचा प्रयत्न महसूल, पोलीस, वनविभाग व जायकवाडीचा अधिका-यांचा अक्षम्य दुर्लक्षामुळे घडला आहे. कालवा निरीक्षकावर कार्यवाही करुन काही साध्य होणार नाही. स्थानिक तलाठी, पोलीस यांचीही विचारणा होणे गरजेचे आहे. अजुन पंधरा मीटर चर खोदला गेला असता तर दोनशेहून अधिक गावांचा व उद्योगांचा पाणीपुरवठा प्रभावित झाला असता ही घटना छोटी समजून दुर्लक्षीत करु नका सखोल चौकशी करा, दाबादाबीचा प्रयत्न मी खपवून घेणार नाही. संबंधीतावर लवकरात लवकर कार्यवाही अशा सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या. या संबंधात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याशीही चर्चा करणार असल्याचे खासदार खैरे यांनी यावेळी सांगितले. वनविभागाच्या गप्प बसण्यावरही खासदार खैरे यांनी शंका उपस्थित करुन जलवाहिनी टाकण्यासाठी परवानगी देण्यास टाळाटाळ करणारा वनविभाग इकोसेन्सीटिव्ह झोन मध्ये ब्लास्टींग होत असतांना, चर खोदतांना का गप्प राहिला असा सवालही त्यांनी उपस्थित केला व वाईल्ड लाईफ ॲक्ट व बर्ड नोटिफिकेशन झोन मध्ये बेकायदेशीर काम केल्याचा गुन्हा दाखल करण्याचा सुचना दिल्या

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525